सोलापूर महानगरपालिका,सोलापूर
उप संचालक,नगर रचना व बांधकाम परवानगी कार्यालय
'इंद्रभुवन', रेल्वे लाईनस, सोलापूर- 413 001.
ई-मेल :-adtpsolapur1@gmail.com दुरध्वनी :0217-2735273

---

जा.क्र /उसंनर/नर/बा.प दि. /०५/२०२४

# प्रेस नोट

**सोलापूर महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक इमारतींचे सर्व्हेक्षण दि.५/११/२०१५ चे शासन निर्णयानुसार व त्यामधील निर्देशानुसार वर्गवारी करून करण्यात आलेले आहे.सर्व्हेक्षणाअंती महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम तरतुदीनुसार कलम २६४ व कलम २६८ च्या नोटीसा बजाविण्यात आलेल्या आहेत.एकूण सर्व्हेक्षण पूर्ण केलेल्या मिळकतींची संख्या १४० असून सर्व १४० मिळकतीना नोटीसा बजाविण्यात आलेल्या आहेत.या पैकी इमारत तथा इमारतीचा भाग अतिधोकादायक असलेली C-1 वर्गातील इमारत संख्या १५ असून या पैकी ७ इमारतींचे म.न.पा.कडून /मिळकतदारानकडून पाडकाम करण्यात आलेले आहे. उर्वरित पैकी ५ इमारतींचा मालक भाडेकरू न्यायालीन वाद चालू आहे. व इतर ३ इमारतींचे पाडकाम दि.३१/०५/२०२४ पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे. १२५ इमारती C-2 व C-3 वर्गवारीतील असून सदर इमारतीचे मिळकतदार व भाडेकरू यांना कलम २६४ ने नोटीसा बजावून भागश: पाडकाम / दुरुस्ती करणे बाबत नोटीसा बजाविण्यात आलेल्या आहेत. या पैकी बहुतांशी इमारती बाबत मालक भाडेकरू असे न्यायालयीन वाद चालू असलेचे निदर्शनास येते तरी धोकादायक इमारतींच्या अनुषंगाने सोलापूर महानगरपालिकेकडून दि.१०/५/२०२४ रोजी सार्वजनिक हिताच्या दृष्टीने जाहिर प्रसिद्धीकरण करण्यात आलेल्या आहेत. तसेच दि.३१/५/२०२४ अखेर पर्यंत अति धोकादायक इमारतीचे परिसरात नागरिकांनी जाऊ नये म्हणून म.न.पा.कडून फलक लावण्याची कार्यवाही ठेवण्यात येत आहे. सर्व इमारतींची वर्गवारीनिहाय यादी SMC-Website ( www.solapurcorporation.gov.in ) वर नागरिकांच्या माहितीस्तव टाकण्यात आलेली आहे.**

**आयुक्त**
**सोलापूर महानगरपालिका ,सोलपुर**